नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/१०/२०२५ (सोमवार )**

---

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद १४ गोवंश जनावरांची सुटका,रामटेक पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक १९/१०/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा नवरगाव फाटा रामटेक, येथे रोडच्या बाजुला अवैधरित्या जनावरांची वाहतुक करणारा आयशर हे वाहन उभे आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ४० सीएम ४४७९ उभा दिसला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १४ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.वाहनाचा चालक/मालक वाहन तेथे सोडुन पळुन गेला होता. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ४० सी.एम ४४७९ किंमती ७,००,०००/— रूपये आणि १४ गोवंश जनावरे किंमती १,४०,००० /— रूपये आणि एक ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती १५,०००/— रूपये असा एकुण किंमती ८,५५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी आयशर ट्रक क्रमांक एम. एच. ४० सीएम ४४७९ चालक/ मालक यांच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सहकलम प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, रामटेक पोलीसांची कामगिरी

दिनांक २०/१०/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत रामटेक पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध दारू काढणारे आरोपीतांबाबत गुप्त बातमीदारकडुन माहीती प्राप्त झाली. सदर माहीती प्राप्त होताच रामटेक पोलीसांनी तात्काळ मौजा पंचाळा जंगल शिवार येथे जावुन कारवाई केली.आरोपी नामे **१) प्रकश भदु दुधपचारे , वय ३५वर्षे,** आणि **२) मारोती भदु दुधपचारे,** दोघे राहणार पंचाळा ता रामटेक अशा आरोपीतांवर कारवाई करत १७५०किलो ग्रॅम मोहाफुल सडवा किंमती ६१,२५०/— रूपये आणि इतर साहित्य असा एकुण ७०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे मिळालेल्या महीतीच्या आधारे मौजा कांद्री माईन येथे जावुन कारवाई केली.आरोपी **नामे १) जग्गु समरू कटोते , वय ४० वर्षे** याचे ताब्यातुन १५ लिटर मोहाफुल दारू किंमती १५०० /— रूपये आणि **एक महीला आरोपी** हीचे ताब्यातुन करत ७० लिटर मोहाफुल सडवा किंमती ३२६०/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला. **सर्व कारवाई मध्ये एकुण ७४,७६० /—** रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नाशवंत मुद्देमाल नाश करण्यात आला महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.





## सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना — ऑक्टोबर २०२५ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत खालील प्रमाणे खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक २०/१०/२०२५ रोजी **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत सहा पोलीस निरीक्षक श्री किशोर भुजाडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांनी लष्करशाह दर्गा येथील उर्स कार्यक्रमामध्ये हजर असलेल्या ग्रामस्थांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली. **तसेच पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत सहा पोलीस निरीक्षक श्री प्रशांत

भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी ग्रामपंचायत टाकळघाट येथे टाकळघाट येथील ग्रामस्थांना सायबर सुरक्षे बाबत माहीती देवुन जनजागृती केली.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,**

**१. ऑनलाईन फ्री गिफ्ट च्या अमिषाला बळी पडु नका. इमेल आयडी पडताळुन खात्री करा. तुमची फसवणुक होवु शकते.**

**सायबर गुन्हयांची तक्रार नोंदविण्यासाठी www.cybercrime.gov.in या संकतेस्थळावर किंवा हेल्पलाईन क्रमांक 1930 , 1945 यावर तक्रार नोंदवा.**



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक

दिनांक १९/१०/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २०/१०/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली.तसेच पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत कन्हान शहरात धरमनगर, संताजी नगर, अशोक नगर, विवेकानंद नगर, खदान क्रं ३, गहु हिवरा चौक , पिपरी, कांद्री, डुमरी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री संतोष गायकवाड यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने